# 2026
# वार्षिक राशिभविष्य



# २०२६ कसे असेल ?

नवीन वर्ष 2026च्या सर्व वाचकांना अनेक अनेक शुभेच्छा. भविष्याचा वेध घेण्यासाठी सर्वजण उत्सुक असतात नवीन वर्षासाठी नवे नियम नवे आराखडे तयार केले जातात. त्यामुळे जुने जाऊ द्या मरणालागुनी म्हणून मागचे तणाव दुःख विसरून नव्या दिशेने जाऊन प्रयत्नांचा जोर वाढवून निश्चित दिशेने यश संपादन करण्याची सर्वांची इच्छा असते. अनुभवी व्यक्तीला त्याच्या जुन्या चांगल्या वाईट अनुभवांचा उपयोग करता येतो व त्यानुसार निर्णय ठरवता येतो. युवा व्यक्तीला म्हणूनच वडील माणसे काही प्रसंगासाठी सल्ला देण्याचा प्रयत्न करत असतात. भविष्य याच कारणासाठी जाणून घ्यावे लागते की आपण सतर्क राहून कठीण प्रसंगावर मात कशी करता येईल याचा विचार जाणून घेता येतो. मार्गदर्शक म्हणून नक्की शास्त्राचा उपयोग होत असतो या वर्षात जानेवारी  ते जून पर्यंत गुरु महाराज मिथुन राशीत आहेत. त्यानंतर जून ते ऑक्टोबर कर्केत आहे शनी मीनेमध्ये आहे. राहु मकरेत व केतू कर्केत आहे. हर्षल वर्षभर वृषभेत आहे. नेपच्यून मीनेत व प्लूटो कर्केत आहे कुंभ, मीन व मेष या राशीना साडेसाती सुरू आहे. हनुमान चालीसा / श्री मारुती स्तोत्र वाचणे हितकारक ठरेल. प्रत्येक राशीच्या गुणधर्मानुसार मानवावर त्याचा परिणाम होतो. त्याचा स्वभाव बनतो. शरीर बनते. व विचारशक्ती तयार होत असते. पुढील प्रमाणे प्रत्येक राशीचे विचार वाचा.

# मेष

नवीन वर्षात नवे अनुभव, नवा परिचय, नव्या शुभेच्छा. मेष व्यक्ती नेहमी स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करतात. हेच त्यांचे वैशिष्ट्य, कौतुक आहे. स्वतंत्रपणे जीवन जगण्याची पद्धत त्यांना मोठ्या पदापर्यंत नेते. परंतु यावर्षात मात्र कठीण प्रसंगांना फारच चतुरपणे सामोरे जावे लागेल. अहंकार ठेवून उपयोग होत नाही. मेष राशीला साडेसाती सुरू आहे. कोणताही निर्णय घेताना घाई करून चालणार नाही. जुने नवे अनुभव तसेच अनुभवी लोकांच्या जीवनातील अनुभवांचा विचार करणे सुद्धा उपयुक्त ठरेल. वरिष्ठांना कमी लेखून चालणार नाही. समोरच्या व्यक्तीचा पूर्ण अभ्यास केल्याशिवाय त्याला कमी लेखणे कधीच योग्य ठरत नाही. माणूसपण ओळखणे जीवनात फारच महत्त्वाचे असते. या वर्षात स्वतःचेच विचार योग्य असे म्हणणे धाडसाचे ठरेल. त्यामुळे उतावळेपण, अहंकार, अभिमान याच्या आहारी जाणे अयोग्य ठरेल. जानेवारी, फेब्रुवारी, एप्रिल, मे, जून या कालावधीत अनेक समस्या सोडवता येतील. नोकरीधंद्यात अथवा तुमच्या क्षेत्रात तुम्ही मनाप्रमाणे निर्णय घेऊन प्रगतीचा नवा टप्पा गाठाल. प्रकृतीची हेळसांड मात्र करू नका. एप्रिल, सप्टेंबरमध्ये प्रवासात सावध राहा. वैर वाढेल. रागावर ताबा ठेवा. मनावर दडपण येईल. तसेच व्यवसायात चूक करू नका. नवीन परिचय फसवा ठरू शकतो. श्री हनुमान स्तोत्र वाचणे हितकारक ठरेल मार्गदर्शन होईल. अविवाहितांना लग्नाची योग्य स्थळे मिळतील. मार्च ते मे प्रेमाला चालना मिळेल. नवीन परिचय उत्साहवर्धक. कोर्ट केस जास्त रेंगाळत ठेवू नका. एखादी साधी व्यक्तीसुद्धा तुमच्या कठीण काळात मदत करू शकते. त्यामुळे स्वतःच्या भ्रमात राहू नका. कायदा मोडेल असे कृत्य सप्टेंबर, नोव्हेंबरमध्ये करू नका. मोह व्यसन नको. समतोल राखा. यश जिद्दीने मिळवावे लागेल.

# वृषभ

वृषभ राशीच्या व्यक्ती मनाने खंबीर स्थिर असतात. ध्येय गाठावयाचे आहे हे त्यांनी ठरवावे. कारण इतरांचा सल्ला त्यांना फारसा आवडत नाही. 2026 च्या खूप शुभेच्छा. चांगल्या संधीचा फायदा घेणे फार महत्वाचे असते. ग्रहांची साथ आहे त्यामुळे प्रयत्न, नियमितपणा व निश्चयाची गरज आहे. तरच तुम्ही मोठे यश संपादन करू शकाल. तुमच्या क्षेत्रात उच्च दर्जाची प्रगती करू शकाल. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी हे धोरण ठेवू नका. जीवनाला उत्तम प्रकारची कलाटणी देता येईल. तुमच्या क्षेत्रात जानेवारी ते मार्च जून, जुलै, सप्टेंबर, नोव्हेंबर मध्ये पुढे जाल. तसेच कोणतेही किचकट कठीण काम करून घ्या. प्रतिष्ठा वाढविणारे प्रसंग येतील. एप्रिल व ऑक्टोबर मध्ये नम्रता ठेवा. नोकरीधंद्यातसुद्धा मनाप्रमाणे प्रगती करण्याची संधी मिळेल. चांगले भागीदार मिळाल्याने व्यवसायात नवा विक्रम करता येईल. दर्जेदार व्यक्तींचा परिचय होईल. राजकीय सामाजिक क्षेत्रात पद प्रतिष्ठा मिळेल. मे, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर मध्ये प्रवासात, व्यवहारात, मैत्रीत सावध राहा. दुखापत, नुकसान, तणाव टाळा. कायदा मोडू नका. ग्रहांची साथ आहे त्यामुळे समस्येवर उपाय शोधता येईल. कोणत्याही प्रकारची कोर्ट केस असल्यास मिटवा. वैवाहिक जीवन सुरू करता येईल तसेच संतती प्राप्तीची संधी घेता येईल. जून, जुलै, सप्टेंबर घर, वाहन, जमीन खरेदी विक्रीत लाभ. मे, ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये व्यसन मोह नको. कायदा पाळा. नवीन परिचयावर भाळून जाऊ नका. वस्तु सांभाळा. घरगुती नाते जपा. कला क्रीडा साहित्य क्षेत्रात तुम्हाला प्रगतीचा नवा टप्पा गाठता येईल. प्रतिष्ठा चांगल्या व्यक्तीचे मार्गदर्शन सहाय्य मिळेल. जून, जुलै, सप्टेंबरमध्ये उच्चप्रतीचा सन्मान प्राप्त होईल. क्षेत्र कोणतेही असले तरी तुमच्याबद्दल झालेला गैरसमज वाद तणाव मिटवता येईल. नवीन यशाचा मार्गाने पुढे जाता येईल. सातत्य ठेवा. आळस सोडा. स्वतःच्या उत्कर्षासाठी स्वतःच मेहनत घ्यावी लागते हे फार महत्त्वाचे असते.

# मिथुन

बुद्धिवादी  असल्याने वादविवादात नेहमी सरस ठरणारे मिथुन राशीचे लोक मनमिळावू असतात. फक्त निश्चित धोरण ठरवल्यावर त्यासाठी लागणारी मेहनत घेण्यास आळस करू नका. तुमच्या चातुर्याचा पुरेपूर उपयोग करून तुमचे ध्येय गाठा. नियमित आहार, व्यायाम आणि ठरविलेल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी कष्ट घ्या. नक्कीच यशाची पताका तुमच्या क्षेत्रात फडकवता येईल. नावलौकिक वाढेल. चांगले संबंध तयार होतील. तुमच्या इच्छेनुसार कामे होतील. वैवाहिक जीवनाला सुरुवात होईल. तसेच संततीप्राप्तीचा योग व्यर्थ घालवू नये. संसारातील मतभेद संपवता येते. कोर्ट केस जिंकता येईल . तुमच्या क्षेत्रात वेगाने प्रगतीचे शिखर गाठता येईल. राजकीय सामाजिक क्षेत्रात वर्चस्व वाढेल. पद प्रतिष्ठा लोकप्रियता मिळेल. त्यासाठी अनेक योजना राबवता येतील. जानेवारी, मे, नोव्हेंबरमध्ये नम्रता ठेवा. तटस्थ राह. जानेवारी, जून, जुलैमध्ये तणाव वाद. प्रवासात धोका, विश्वासघात होईल. तसेच व्यवहारात नुकसान टाळा. नवीन ओळखीवर एकदम व्यवहार करू नका. व्यसन मोह यात फसू नका. नोकरीत परदेशात जाण्याची संधी मिळेल. तुमच्या अनेक स्वप्नांना पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, जुलै, ऑगस्ट ते ऑक्टोबर अनेक कामे करून घ्या. कोर्ट केस मिटवा. ठरवलेल्या योजनांना गती द्या. नावलौकिकात भर पडणाऱ्या या घटना घडतील. लोकप्रियता वाढेल. प्रेरणादायक व आत्मविश्वास वाढविणाऱ्या प्रसंगाने उत्साह वाढेल. प्रवासाचा आनंद घेता येईल. घर, वाहन, जमीन खरेदी विक्रीत  लाभ. जानेवारी, जून, ऑगस्टमध्ये तणाव वाद जास्त वाढवू नका. वाहनाचा वेग कमी ठेवा. दुखापत ऑपरेशनची शक्यता. घातक कृती टाळा. कायदा पाळा. तुमच्या क्षेत्रात तुम्ही नक्कीच प्रगतीचा आलेख उंचावणार आहात. मेहनत घ्या .

# कर्क

नियमितपणा, शिस्तबद्ध वागणूक याची आवड असलेल्या कर्क राशीला नवीन वर्षाच्या शुभेच्छा. आपण ठरवू तेच होईल आपण बोलू त्याच पद्धतीने सर्वजण निर्णय घेतील याचा आग्रह धरणे मानसिक ताण तणाव वाद व चिंता याला आमंत्रण दिल्यासारखे होईल. यावर्षात तडजोड स्वीकारावी लागेल. कमीपणा घेऊन दुसर्यांचे विचार ऐकावे लागतील. परिस्थितीशी मिळते जुळते धोरण घ्यावे लागेल. घरगुती ताण तणाव होतील. कौटुंबिक वाटाघाटीत मतभेद. नोकरीधंद्यात चढ उतार अनुभवास येईल. जबाबदारी स्वीकारावी लागेल. गुंतवणूक करताना सावध भूमिका घ्यावी लागेल. आधार स्तंभ असलेल्या व्यक्तींना मुकावे लागण्याची शक्यता निर्माण होईल. फेब्रुवारी, जून, ऑक्टोबर, डिसेंबरमध्ये मनावर दडपण येईल. दगदग वाढेल. नोकरीत व्याप असेल. मिळते जुळते धोरण स्वीकारावे लागेल. कोर्ट केसमध्ये चिंता राहील. मार्च, ऑगस्ट मध्ये प्रवासात सावध राहा. दुखापत नुकसान येण्याची शक्यता. कोणत्याही प्रकारचे धाडस जिवावर बेतण्याची शक्यता. वैर नको. प्रकृतीची काळजी घ्या. मे, जून, जुलै शब्द पाळता येणे कठीण. नवीन परिचय धोकादायक ठरेल. तसेच कोणताही व्यवहार फसवा ठरू शकते. नोव्हेंबर 2026पासून तणाव चिंता कमी करता येईल. अडचणीतून मार्ग शोधता येईल. जून नंतर अनेक प्रश्नांवरील उत्तरे शोधता येतील. वर्षाच्या सुरुवात थोडी कष्टाची असली तरी श्रावणापासून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील. जिद्द ठेवा. प्रयत्न करा. यश खेचून आणा .

# सिंह

तुम्ही ठरविलेला विचार आणि इतरांनी नेहमीच साथ द्यावी असा तुमचा मानस असतो. त्यानुसार निर्णय झाला नाही तर तुम्ही त्या व्यक्तीची साथ सोडता नाही तर त्याच्याशी संबंध कमी ठेवता. 2026 ची सुरुवात जोमाने करता येईल. ठरवलेले ध्येय पूर्ण होण्याची शक्यता जास्त आहे. तरीही कुठेही बेसावध राहू नका धोका संपला आहे असे समजू नका. म्हणजे  यश संपादन करता येईल. क्षेत्र कोणतेही असो फेब्रुवारी, एप्रिल ते जून मेहनत घ्या. यश खेचून आणा. जानेवारी, एप्रिल, सप्टेंबरमध्ये तणाव दुरावा. प्रवासात दौऱ्यात सावध राहा. वाहनाचा वेग नियंत्रणात ठेवा. वैर वाढेल. दुखापत होईल. प्रकृतीची योग्य प्रकारे काळजी घ्या. जुलै, नोव्हेंबरमध्ये विरोधक मैत्रीची भाषा करतील. तुमच्याशीं संबंध वाढविण्याचा वेगळा पवित्रा अमलात आणतील. तणाव व चिंता वाढवली जाईल. गुपित उघड होण्याची शक्यता आहे. त्यामुळे क्षेत्र कोणतेही असो चौफेर सतर्क राहा. वैयक्तिक जीवनात ताळमेळ साधणे म्हणजे तारेवरची कसरत असेल. धावपळ दगदग वाढेल. नोकरीधंद्यात टिकाव धरून राहणे योग्य राहील. नव्या रस्त्याने जाणे म्हणजे धोका नुकसान करून घेतल्यासारखे होईल. त्यामुळे हातात जे काम आहे त्यालाच योग्य प्रकारे टिकवून ठेवणे गरजेचे असेल .आपसात गैरसमज दुरावा येईल. कौटुंबिक वाटाघाटीमध्ये योग्य निर्णय घेणे कठीण राहील. अनाठाई खर्च होऊ शकतो. नवीन परिचय धोकादायक फसवा ठरेल. मौल्यवान वस्तू सांभाळा. जुने अनुभव मार्ग शोधण्यास उपयुक्त ठरतील. वरिष्ठांचा विचार जरूर घ्या.

# कन्या

परिस्थितीचा योग्य अभ्यास करून निर्णय घेण्याची क्षमता तुमच्यात भरपूर आहे. वेळेला महत्त्व द्या आणि तुमच्या स्वप्नांना सोनेरी कडांनी उजळून टाका. ज्या क्षेत्रात असाल तेथे तुमचा उदोउदो होईल. आर्थिक मानसिक शारीरिक सर्वबाजूने समृद्ध व्हा. घर वाहन जमीन खरेदीचा विचार पूर्ण करता येईल. अनेक ओळखी फायदेशीर व उत्साहवर्धक ठरतील. जुना वाद गैरसमज मिटवून टाका. नव्याने जीवन जगण्यास सुरू करा. कोणत्याही व्यसनातून बाहेर पडण्याची इच्छा ठेवा प्रयत्न करा. यश नक्कीच मिळेल. बुद्धिमत्तेचा वापर करून शिक्षणातील अडचणी दूर करता येतील. विचार कृती यांचा योग्य मेळ घालावा म्हणजे मनाप्रमाणे घटना घडतील. चांगली संधी फार काळ नसते. फेब्रुवारी, एप्रिल, ऑगस्ट मध्ये नम्रता ठेवा, उतावळेपणा नको, वरिष्ठांना दुखवू नका. मार्च मे नोव्हेंबरमध्ये तणाव गैरसमज, वैर वाढेल. त्यानुसार काळजी घ्या. प्रवासात सावध राहा. दुखापत टाळा. कायदा सर्वत्र पाळा. जानेवारी ते जुलै सप्टेंबर ते डिसेंबर तुमच्या अडचणी कमी होतील. पद प्रतिष्ठा मिळेल. कोर्ट केस जिंकता येईल. तसेच आपसातील गैरसमज दूर करून नव्याने संबंध जपता येतील. कोणताही अपुरा व्यवहार देऊ नका. कामाची चालढकल करू नका .पूर्वी केलेल्या चुका सुधारता येतील.  नव्याने जीवनप्रवाह सुरू करता येईल. नोकरी धंद्यात वाढ लाभ. व्यापक स्वरूप तुमच्या कामाला देता येईल. आळस नको. जिद्द ठेवा. मेहनत घ्या. यशाचा मनसोक्त आनंद घ्या.

# तुला

प्रगतीपथाकडे जाण्याची संधी शोधता येईल. तन मन धन याच्या समृद्धीकडे लक्ष देता येईल. तुमच्या क्षेत्रात उच्च प्रतीचे यश मिळवण्यासाठी सशक्त प्रयत्न करता येतील. संपूर्ण मार्ग सहज असेल असे पूर्णपणे नाही. अचानक विरोध करणारे स्पर्धा करणारे लोक तुमच्या बाजूने बोलतील. मदत करतील. ज्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकला असे काही लोक तणाव निर्माण करतील. योग्य निर्णय घेण्याची क्षमता मात्र ठेवावी लागेल. जानेवारी , एप्रिल, जून या कालावधीत तणाव वाद चिंता दुखापत अडचणी  येतील. कोणताही प्रसंग सावधपणे हाताळावा लागेल. मार्ग मिळेल. जानेवारी, मार्च, मे, सप्टेंबरमध्ये नोकरी धंद्यात  राजकारणात नमते धोरण ठेवा. गैरसमज कामात चुका होतील. वरिष्ठांना दुखवू नका. फेब्रुवारी, एप्रिल, जुलै, ऑगस्ट, नोव्हेंबर, डिसेंबर उत्साहवर्धक घटना. प्रगतीची उत्तम संधी तुमच्या क्षेत्रात मिळेल. परदेशात जाण्याचा योग येईल. नोकरीत मनाप्रमाणे बदली करण्याची इच्छा पूर्ण कराल. राजकारणात प्रतिष्ठा पद मिळेल. लोकप्रियता वाढेल. तुमच्या कार्याचा गौरव होईल. मानसन्मानाचे सौख्य अनुभवास येईल. अनेक दिवसांची इच्छा ज्याप्रमाणे असेल ती पूर्णत्वास नेता येईल. घर वाहन जमिनीसाठी जे प्रयत्न करावयाचे असतील ते करा. सुखाचा नवा अनुभव नक्कीच उपभोगता येईल. अविवाहितांना स्थळे येतील. जुना संसारातील वाद मिटवता येईल. संततीप्राप्तीचा प्रयत्न करता येईल. किचकट कोर्ट केस अथवा वैर मिटवता येईल. मनातील सुप्त इच्छा पूर्ण करा. शारीरिक स्वास्थ्य अधिक चांगले करा. नवा परिचय  फायदेशी उत्साह देणारा असेल.

# वृश्चिक

.या वर्षात अस्थिरता दगदग राहिल. तुमच्याबद्दल गैरसमज पसरवला जाईल. तुम्ही तुमच्या आजूबाजूला घटनांमुळे विचलित व्हाल. स्वतःच्या प्रकृतीची वस्तूची योग्य प्रकारे काळजी घ्या. इतरांच्या सांगण्यावरून मत ठरवू नका. तुमच्या क्षेत्रात कामाचा व्याप वाढेल.ळ  त्यामुळे धावपळ, दगदग होईल.  आर्थिक लाभ होईल.  परंतु धाडस फारच महत्त्वाचे ठरेल. इतरांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून कोणताही व्यवहार करू नका. खर्या खोट्याची शहानिशा करणे फार महत्त्वाचे ठरेल. एखाद्या कामासाठी घेतलेली मेहनत कदाचित वाया गेली असे वाटेल पण प्रत्येक ठिकाणी फायदा कमी पण शिकण्यास जास्त मिळाले आहे हे मात्र मोलाचे ठरू शकते. त्याचा उपयोग पुढील कार्यास नक्कीच होईल. राजकीय सामाजिक क्षेत्रात फेब्रुवारी, एप्रिल, जूनमध्ये आरोप येतील. प्रतिष्ठा पणाला लागेल. नोकरीमध्ये कामाचा व्याप वाढेल. वर्चस्व सिद्ध करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतील. शुल्लक कारणाने विचलित न होता धैर्याने कार्यभाग साधावा लागेल. फेब्रुवारी, मे, ऑगस्ट मध्ये कठीण प्रसंगावर मात करून यश खेचावे लागेल. प्रकृतीकडे लक्ष द्या. वाद वाढवू नका. गैरसमज होईल परंतु सर्वांवर मात करून यश खेचता येईल. जिद्द ठेवा. हतबल करण्याचा प्रयत्न होईल. खंबीर राहा. प्रयत्न करणे हेच खरे महत्त्वाचे आहे याचा निश्चितच प्रत्यय येईल . जुलै ते ऑगस्ट, नोव्हेंबर, डिसेंबर दिलासा देणारा कालावधी. मनस्वास्थ्य मिळेल. घेतलेले परिश्रम सत्कारणी लागण्याचे निश्चितच समाधान मिळेल. दुरावा संपेल. चांगली घटना तुमचे हास्य सौख्यसमाधान परत मिळवून  देईल.

# धनु

नवीन वर्षाच्या शुभेच्छा ग्रहांच्याद्वारे  मिळत आहेत. या वर्षा अचानक काही  विपरीत घटनांचा परिचय होईल. तुमच्यावर एखादी दडपण येईल.  विश्वासार्ह वाटणारी व्यक्ती तुमचा अपरोक्ष काय राजकारण  खेळेल  याचा अंदाज येण्यास थोडा वेळ लागेल. क्षेत्र कोणतेही असले तरी कायद्याला धरून वागा बोला. ज्यावर जास्त विश्वास ठेवला अशी व्यक्ती अचानक तुमच्या विरोधात जाऊ शकते याचा अंदाज तुम्हाला घेताही येणार नाही. तरीही तुमच्या चौकस बुद्धीचा निश्चितच उपयोग होईल. प्रसंगी आक्रमक भूमिका घ्यावी लागेल. शारीरिक मानसिक दडपण येईल. दुरावा निर्माण होऊ शकत. वर्षाचा पूर्वार्धात अतिशय कठीण कामे करून घ्या. कोणताही किचकट प्रश्न रेंगाळत ठेवू नका. गैरसमज वेळच्यावेळी संपवण्याची तयारी ठेवा. जास्त आक्रमक भूमिका मे, जुलै, नोव्हेंबरमध्ये घेऊ नका. प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न केला जाईल. एप्रिल, मे, जून, सप्टेंबरमध्ये दुखापत होईल. प्रवासात सावध राहा . कोणतेही प्रकरण एकदम तापण्याची शक्यता आहे. वैर वाढवू देऊ नका. तसेच प्रकृतीची काळजी घ्या. एखादा विरह सहन करावा लागेल. जानेवारी, फेब्रुवारी, एप्रिल, जून,  ऑगस्ट, ऑक्टोबरमध्ये येणार्या कठीण प्रसंगावर मात करण्याचा मार्ग शोधता येईल. मान प्रतिष्ठा वाढवणारा घटना घडतील. गुप्त कारवायांवर नजर ठेवा. प्रसंगी तुम्हाला तटस्थ भूमिका घ्यावी लागेल. नोकरी टिकवा. धंद्यामध्ये  हलगर्जीपणा आळस  नको. इतरांना मदत करण्यामध्ये स्वतः अडचणीत येऊ नका. विद्यार्थी वर्गाने ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. व्यसन मोह नुकसानकारक.

# मकर

नवीन वर्षात तुम्हाला अडचणी, विरोध  यावर मात करून यश जिद्दीने मिळवावे लागेल. चांगल्या विचारपद्धतीने जाऊन एखादे मोठे यश मिळविण्याचा तुमचा प्रयत्न असला तरी नियती, काही व्यक्ती अडचणी निर्माण करण्याची शक्यता आहे. तुम्ही ठरवाल त्याच पद्धतीने प्रगतीचा टप्पा गाठता येईल अशा भ्रमात राहू नका. सतर्क राहा. सावध राहा. म्हणजे अडचणीवर मात करता येईल. वर्षाच्या पूर्वार्धात तडजोड करून यश जिद्दीने प्राप्त करावे लागेल. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जुलै, सप्टेंबर, नोव्हेंबरमध्ये दिलासा देणाया घटना घडतील. मान प्रतिष्ठा वाढण्याची शक्यता निर्माण होईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. नोकरी धंद्यात टिकून राहावे लागेल. मनाप्रमाणे बदल होईल असे समजू नका. तरीही ऑक्टोबर ते नोव्हेम्बर चांगल्या घटना घडतील. मनावरील दडपण कमी होईल. मोकळा श्वास घेता येईल. त्यामुळे या वेळात कठीण किचकट कामे करून घ्या. अपरिचित व्यक्तीवर एकदम विश्वास टाकून कोणतेही काम अथवा गुंतवणूक जून, ऑगस्ट, नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये करू नका. रागाचा पारा वाढेल तेव्हा नम्रता ठेवा. प्रवासात धोका होईल काळजी घ्या. तसेच प्रकृतीची हेळसांड होऊ देऊ नका. जुलै, सप्टेंबर, ऑक्टोबर मध्ये समतोल राखून  महत्त्वाची भूमिका निभावता येईल. सहाय्य मिळेल. दडपण कमी करू शकाल. मान प्रतिष्ठा मिळेल. दिलासा प्रेरणा देणारी घटना तुमचा उत्साह आत्मविश्वास वाढवेल. खंबीरपणा महत्त्वाचा ठरेल .

# कुंभ

नवीन वर्षाची सुरुवात उत्साहात आनंदात करा. ठरविलेले ध्येय पूर्ण करा. कामांची योग्य प्रकारे रूपरेखा तयार करून वेळेला महत्व देऊन इच्छित यश संपादन करा. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, जून ठरविलेल्या योजनांना गतिमान करू शकाल. तसेच तुमच्या क्षेत्रात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल .अनेक दिग्गज सहाय्य करतील .तुमची प्रतिमा उजळेल .वैयक्तिक जीवनातील अनेक कामे मार्गी लावता येतील.राजकीय सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठेचे साम्राज्य वाढेल. सामाजिक कार्याला नवी दिशा मिळेल. नोकरी धंद्यात समृद्धी आणता येईल. कोणताही किचकट कठीण प्रश्न मात्र रेंगाळ ठेवू नका. चांगल्या संधीचा पुरेपूर फायदा उठवा. घर, वाहन, जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार करता येईल. जानेवारी, जून, सप्टेंबर मध्ये राग वाढवणाऱ्या घटना घडतील. आरोप येईल. शारीरिक त्रास. वाहनाचा वेग संयमात ठेवा. वैर वाढवणे सोपे वाटले तरी परिणाम वाईट असतात. जुलै, सप्टेंबर मध्ये आरोप येतील .प्रतिष्ठा जपा. नोकरी टिकवा. तुमच्या प्रामाणिकतेवर संशय घेतला जाईल. शब्द जपून वापरा. नातेसंबंध जपावे लागतील. मे, ऑगस्टमध्ये व्यवहारात सतर्क रहा. मोह व्यसनाने नुकसान. जून, सप्टेंबर मध्ये मानसिक शारीरिक तणाव वाढेल. क्षेत्र कोणतेही असो निर्णय घेताना चौफेर सावध राहून विचारपूर्वक निर्णय ठरवावा लागेल. अपेक्षांना बांध घालावा लागेल. संमिश्र स्वरूपाचे वर्ष ठरेल. त्यामुळे शारीरिक मानसिक आरोग्य टिकवणे फार महत्त्वाचे आहे.

# मीन

नववर्षाच्या अनेक शुभेच्छा. तरल स्वभावाच्या मीन व्यक्ती असतात. आपल्या माणसाला मदत करणे हा त्यांचा स्वभावच आहे. मीन राशीला साडेसाती सुरू आहे. दुसरे पर्व चालू आहे. वेगवेगळ्या स्वभावाची माणसे नेहमीच भेटत असतात. आपल्याकडे चांगले वाईट बरे अनुभव जमा असतात. त्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्याची गरज तुम्हाला भासेल. भावनेच्या आहारी न जाता काही निर्णय यावर्षात फेब्रुवारी, जून, ऑगस्ट, ऑक्टोबरमध्ये घ्यावे लागतील. क्षेत्र कोणतेही असो सावधपणे वैर  न वाढवता संयमाने वागावे लागेल .नोकरी धंद्यातून अडचणींवर मात करावी लागेल. रागावर ताबा ठेवून बोलावे लागेल. तसेच वाहनाचा वेग नियंत्रणात ठेवावा लागेल. शत्रुत्व करणे हा तुमचा स्वभावच नाही. परंतु समोरच्या व्यक्तीच्यामुळे तुम्हाला एखादा निर्णय घेण्याची वेळ येऊ शकते. जानेवारी, एप्रिल, मे, सप्टेंबर, नोव्हेंबर, डिसेंबर मध्ये तणाव कमी होईल. नोकरी व्यवसायात चांगली संधी मिळेल. प्रयत्नांना योग्य न्याय मिळेल. प्रतिष्ठा पत वाढेल. गैरसमज दूर होऊन नव्याने संबंध प्रस्थापित करता येतील. लोकप्रियता सन्मान मिळेल. व्यवसायात या वर्षात पुढे जाता येईल. फेब्रुवारी, जुलै, सप्टेंबरमध्ये भावनेच्या भरात निर्णय घेऊ नका. नवीन परिचयावर जास्त भरवसा ठेवू नका. वस्तु माणसे जपा.  खाण्याची काळजी घ्या. मोह नको .श्री मारुती स्तोत्र वाचणे हितकारक ठरेल . तुमच्या क्षेत्रात प्रगतीकारक वातावरण मिळेल. अडचणीवर  मात करण्याची वृत्ती अधिक प्रभावी होईल. अनपेक्षित व्यक्तीचे मार्गदर्शन सहाय्य मिळेल. अनेक इच्छा आकांक्षा बऱ्याच प्रमाणात पूर्ण होतील .